# मातांचे त्यांच्या पाल्यांच्या माध्यमिक शिक्षणातील योगदानाचे अध्ययन

**डॉ. सुरेखा जयंत गुडधे (गोतमारे)**
श्री निकेतन कला व वाणिज्य महाविद्यालय, नंदनवन, नागपूर
Email Id - surekha-g278@gmail-com

---

***सारांश :***

*जन्मापासून मृत्युपर्यंत व्यक्तीचे शिक्षण सुरूच असते. व्यक्तीच्या शिक्षणाला सुरवात ही कुटुंबातूनच होत असते आधुनिक काळातील शिक्षणाचे महत्व वाढलेले आहे, काळानुसार शिक्षण पद्धतीत बदल होत चाललेला आहे. त्यामुळे पालकांची जबाबदारी वाढलेली आहे. शाळेच्या निवडीपासून ते आजच्या शिक्षणपद्धतीपर्यंतचे सर्व ज्ञान त्यांना असणे आवश्यक झालेले आहे. आपल्या शिक्षणाचे स्वरुप हे सोप्या अभ्यासक्रमापासून कठीण असे बदलत जाते व त्यानुसार शिक्षणाचे विभाजन केलेले आहे. जसे, पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, विद्यापिठीय शिक्षण व इतर. माध्यमिक शिक्षणाचा काळ म्हणजेच बौद्धिक शिक्षणाचा. प्राथमिक व विद्यापीठीय शिक्षण यांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक शिक्षण. त्यामुळे मुलांचे माध्यमिक शिक्षण सुरू असतांना मातांना घरातील कामाचे योग्य व्यवस्थापन करुन मुलांकडूनही अभ्यास करवून घ्यावा लागतो. तिला त्यांच्यावर अधिक लक्ष केंद्रीत करावे लागते. कारण या काळातील अभ्यासाच्या प्रगतीवरच मुलांचे भविष्य अवलंबून असते. याच वयात त्यांचा योग्य व्यक्तीमत्व विकास साधता येतो.*

*मुलं नैसर्गिकपणे शिकण्यासाठी अवलंबून असतं ते आईवर. मुलाचा प्रत्यक्ष अभ्यास घेणं, त्याला मानसिक आधार देणं, अभ्यासाच्या पद्धती शिकवणं, दिशा देणं, अभ्यासाचं महत्व त्याच्या मनावर बिंबवणं आणि तो योग्य तऱ्हेनं अभ्यास करतो आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवणं ही पालकांची विशेषतः आईची जबाबदारी आहे. जीवनसत्वयुक्त आहारामुळे व्यक्तिमत्व उंचावण्यास मदत होते. अभ्यास करतांना मुलांना थोडा अल्पोहार मिळणे आवश्यक आहे जो की त्यांचा विकास संतुलित करण्यास मदत करतो. तसेच योगासन वा प्राणायम मुळे मुलांचा सर्वांगिण विकास होतो. तसेच मुलांमधील भावनात्मक व मानसिक ताण दूर होऊन बौद्धिक व शारीरिक कौशल्यात वाढ होते. नियमित योगाभ्यासामुळे मुलांच्या शारीरिक क्षमतेचा विकास होतो, भावनात्मक स्थैर्य येते तसेच बौद्धिक विकास होतो. आपल्या पाल्यांची बौद्धिक क्षमता लक्षात घेऊन माता मुलांकडून अभ्यास करवून घेतात.*

Keywords : शिक्षण, माध्यमिक शिक्षण, मातेचे योगदान, कुटुंब, विद्यार्थी

---

**प्रस्तावना :**

व्यक्ती जन्माला आल्यापासून ते मृत्युपर्यंत शिक्षण घेतच असते. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. व्यक्तीच्या शिक्षणाला सुरवात ही कुटुंबातूनच होत असते. म्हणजेच शिक्षण मिळविण्याचे प्राथमिक केंद्र कुटुंबाला म्हणता येईल. आधुनिक काळातील शिक्षणाचे

महत्व वाढलेले आहे, शिक्षणाचा दर्जा उंचावला आहे. तंत्रज्ञानाचा वापर, वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित झालेला आहे. सर्वच क्षेत्रात अद्ययावत् ज्ञानाची भर पडत आहे म्हणून विद्यार्थ्यांबरोबरच कुटुंबीयांनाही शिक्षणाबाबत जागरुक असणे अत्यावश्यक झालेले आहे काळानुसार शिक्षण पद्धतीत बदल होत चाललेला आहे. त्यामुळे पालकांची जबाबदारी वाढलेली आहे. शाळेच्या निवडीपासून ते आजच्या शिक्षणपद्धतीपर्यंतचे सर्व ज्ञान त्यांना असणे आवश्यक झालेले आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पालकांनी वेळोवेळी शाळेत संपर्क साधला पाहीजे . शाळेतील वातावरणात कौटुंबिक जिव्हाळा तसेच शाळेत दिल्या जाणाऱ्या सुसंस्कारांना पोषक असे वातावरण घरात असणे महत्वाचे आहे. आपल्या शिक्षणाचे स्वरुप हे सोप्या अभ्यासक्रमापासून कठीण असे बदलत जाते व त्यानुसार शिक्षणाचे विभाजन केलेले आहे. जसे, पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, विद्यापिठीय शिक्षण व इतर. यातील एक–एक पायरी चढून व्यक्ती ज्ञान मिळवित असते व त्यामुळे त्याचे विचार अधिक प्रगल्भ होत जातात. आपल्या देशात उच्च शिक्षण घेण्याकरीता व्यक्तीला त्याच्या आवडीनुसार विषयाची निवड करता येते परंतु दहावीपर्यंत म्हणजेच माध्यमिक शिक्षणापर्यंतचे शिक्षण हे जवळपास सारखेच असते.

माध्यमिक शिक्षणाचा काळ म्हणजेच बौद्धिक शिक्षणाचा. प्राथमिक व विद्यापीठीय शिक्षण यांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक शिक्षण. या वयात मुल शिकण्यासाठी, जाणून घेण्यासाठी, विचार करण्यासाठी पात्र असते. या वयातच त्याची जिज्ञासा जागृत होते. त्यामुळे विविध विषयांचे ज्ञान त्याला द्यावे लागते. फक्त पुस्तकी ज्ञान, शब्दज्ञान देण्यापेक्षा त्याला स्वानुभवातून शिकण्यास मदत करावी व हे कार्य माताच योग्यरित्या पार पाडू शकते. अशावेळी तिला घरातील कामाचे योग्य व्यवस्थापन करुन मुलांकडूनही अभ्यास करवून घ्यावा लागतो. तिला त्यांच्यावर अधिक लक्ष केंद्रीत करावे लागते. कारण या काळातील अभ्यासाच्या प्रगतीवरच मुलांचे भविष्य अवलंबून असते. याच वयात त्यांचा योग्य व्यक्तीमत्व विकास साधता येतो.

**अध्ययनासाठी प्रस्तूत विषय निवडण्याची कारणे :**

माध्यमिक शिक्षण हे पुढील व्यावसायिक शिक्षणाचा पाया समजला जातो म्हणून माध्यमिक शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे. हयासाठी पाल्यांच्या शिक्षणात त्यांच्या मातेचे योगदान मोलाचे ठरते. 21 व्या शतकातील माता ही कौटुंबिक जबाबदारी, नोकरी वा व्यवसाय, तिचे सामाजिक कार्य इ. सर्व सांभाळून पाल्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देत असल्याचे आढळते. ती तिच्या पाल्यांच्या शिक्षणाविषयी अधिक जागरूक असल्याचे दिसून येते. सर्व जबाबदाऱ्या पार पाडून ती मुलांच्या शिक्षणावर स्वतःचे लक्ष कसे केंद्रीत करते, त्यासाठी तिच्या दैनंदिन सर्व कार्याचे नियोजन करतांना तिला कोणत्या समस्या उद्‌भवतात व त्या समस्यांचे निराकरण आजची माता कसे करते हे जाणून घेणे आवश्यक आहे. म्हणूनच मातांचे त्यांच्या पाल्यांच्या माध्यमिक शिक्षणातील योगदान कसे आहे त्यामध्ये शिक्षणानुसार, आर्थिक परिस्थितीनुसार आढळणारी भिन्नता जाणून घेऊन त्यानुसार त्यात आवश्यक त्या सुधारणा घडवून आणता येतील.

**अध्ययनाची व्याप्ती :**

प्रस्तुत अध्ययनात मातांनी त्यांच्या पाल्यांच्या माध्यमिक शिक्षणाविषयी केलेल्या योगदानाचे विद्यार्थ्यांच्यादृष्टीने काय महत्व आहे हयाबाबत शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

प्रस्तूत अध्ययनाची व्याप्ती ही पुढील बाबींशी संबंधीत आहे.

1. हया अध्ययनामुळे मातांना आपल्या पाल्यांचे शैक्षणिक भवितव्य ठरविण्यास मार्गदर्शक सूचना प्राप्त होतील.
2. समाजाला विद्यार्थ्यांचा गुणात्मक दर्जा वाढविण्यास मातांच्या सहकार्याचे महत्व पटेल.
3. शिक्षणतज्ञांना मातांचे पाल्यांच्या शिक्षण व्यवस्थापनतील महत्व कळेल आणि त्यानुसार ते शैक्षणिक योजना तयार करू शकतील.

**अध्ययनाच्या मर्यादा :**

प्रस्तुत अध्ययनाच्या मर्यादा हया पुढीलप्रमाणे आहेत.

1. प्रस्तुत संशोधन हे पूर्व नागपूर शहरापुरतेच मर्यादीत आहे.
2. तसेच माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित विषय आहे. त्यामुळे हा अभ्यास 8, 9, व 10 व्या वर्गापूरताच मर्यादीत करण्यात आलेला आहे.
3. प्रस्तूत अध्ययनात केवळ राज्यस्तरीय अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार केलेला आहे.
4. अध्ययनात गृहिणींच्या शिक्षणविषयक योगदानाचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

संशोधन करीत असतांना पुढील उद्दिष्टये विचारात घेण्यात आली.

1. माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या मातांचे (गृहिणींचे) कौटुंबीक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.
2. मुलांच्या माध्यमिक शिक्षणासंबंधित मातांच्या योगदानाचे अध्ययन करणे.

**समस्येचे विश्लेषण :**

प्रस्तुत अध्ययनात मातांचे अध्ययन करण्यात आलेले आहे आपल्या पाल्याच्या माध्यमिक शिक्षणात त्यांचे योगदान कशाप्रकारे आहे ते स्पष्ट करण्यात आलेले आहे.

**मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाल्यांचा विकास व मातेचा सहभाग :**

मुलांना हाताळतांना पालकांचा दृष्टिकोन मानसशास्त्रीय असणे आवश्यक आहे. या संदर्भात महाकवी खलिल जिब्रान म्हणतात, 'पालकांनी व शिक्षकांनी आपल्या बालकांना प्रेम द्यावे, पण आपले विचार मात्र देऊ नयेत. कारण त्यांना आपले स्वतःचे विचार असतात. ते पालकांना म्हणतात, 'तुम्ही बालकांच्या शरीरासाठी घरे बांधून द्या पण त्यांच्या आत्म्याकरता मात्र ती बांधू नका.

**मातांची अभ्यासक्रमाविषयी जागरूकता आणि मुलांचा शैक्षणिक विकास :**

आज सर्वच स्तरांवर आई प्रत्येक विषयात तज्ज्ञ असेलच असे निश्चित सांगता येत नाही परंतु मातेने दररोज कोणता अभ्यास वर्गात पूर्ण झाला? त्यापैकी काय समजले? आलेली शंका अध्यापकांना विचारली का? योग्य निरसन झाले का? इ. बाबी आपल्या मुलांना विचाराव्यात. त्यात मुलांचे वैयक्तिक मत त्यांच्याकडूनच वदवून घ्यावे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी मातांनी शाळेत वेळोवेळी संपर्क साधला पाहिजे.

**पाल्यांच्या शिक्षणात मातांचे योगदान :**

शिक्षणप्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण करणारे जे काही प्रमुख घटक आहेत त्यामध्ये मातेचे स्थान प्रथम क्रमांकावर आहे. माता हीच प्रत्येक बालकाची पहिली गुरू असते आणि तीच त्याला सर्वकाही शिकवित असते. माता समं नास्ति शरीर पोषणम' म्हणजे मातेसारखे शरीराचे पोषक दुसरे कोणीही होऊ शकत नाही.

**विषयाशी संबंधित संशोधन कार्ये :**

**देशमुख (1992),** (स्त्री शिक्षणाचा त्यांच्या कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणाऱ्या परिणामाचा तुलनात्मक अभ्यास), हया अध्ययनाचा प्रमुख उद्देश स्त्री शिक्षणाचा मुलांच्या सवयीवर तसेच शिक्षणावर काय परिणाम होतो हे अभ्यासणे हा होता. हयाद्वारे प्राप्त निष्कर्षामध्ये असे दिसून आले की, 68 टक्के सुशिक्षित स्त्रियांच्या मते, आईच्या शिक्षणाचा मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो, मुलांकडून अभ्यास कशाप्रकारे करून घ्यावा, त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे हयाविषयीचे ज्ञान शिक्षणामुळे त्यांना असते व त्यामुळे त्या मुलांकडून अभ्यास करवून घेतात.

**राऊत (1993),** (विद्यार्थ्यांच्या पालकांचा आर्थिक – सामाजिक स्तर व त्यांच्या पाल्यांचे शालेय संपादन यांच्या आंतरसंबंधाचा अभ्यास), यांनी केलेल्या संशोधानाचा मुख्य उद्देश विविध आर्थिक, सामाजिक स्तरातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शालेय गुणाचा अभ्यास करणे हा असून त्याद्वारे प्राप्त निष्कर्षात असे आढळून आले की, नोकरी करणाऱ्या स्त्रिया आपल्या मुलांच्या अभ्यासात मदत करीत असतात कारण घराबाहेरील विश्वात त्या वावरत असल्यामुळे शिक्षणातील स्पर्धा त्यांना जास्त ज्ञात असते. तसेच नोकरी न करणाऱ्या परंतु सुशिक्षित व आर्थिक सुबत्ता असणाऱ्या स्त्रियादेखील आपल्या मुलांना शैक्षणिक मार्गदर्शन करतात. त्यामुळे हया विद्यार्थ्यांची शालेय प्रगती चांगली झालेली दिसून येते.

**संशोधन पद्धती :**

आजच्या काळात शैक्षणिक स्पर्धा ही वाढत चाललेली आहे. त्यामुळे मातांना त्यांच्या पाल्यांच्या योग्य विकासाच्या दृष्टीने जागरूक राहणे आवश्यक झालेले आहे. पाल्यांना या काळात उदभवणाऱ्या समस्या जाणून घेणे व त्यावर उपाय सुचविणे अशी दोन्ही कामे मातेला करावी लागतात. एकूणच शैक्षणिक बदलातील चढाओढ लक्षात घेता मातांचे त्यांच्या पाल्यांच्या

माध्यमिक शिक्षणातील योगदानाचे अध्ययन करण्यात आलेले आहे. हयामध्ये मातांची कौटुंबिक माहिती जाणून घेऊन, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाविषयी योगदानाचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

**सर्वेक्षण पद्धती :**

संशोधन हा सत्याचा शोध घेण्याचा एक व्यवस्थित व सुसंघटीत असा प्रयत्न आहे. संशोधन करण्याच्या विविध पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनाकरीता माध्यमिक शिक्षण, कौटुंबिक परिस्थिती, विद्यार्थ्यांची प्रगती, बौद्धिक क्षमता, आवडनिवड, या संबंधीची माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला. सर्वेक्षण पद्धती ही संशोधनाची महत्वाची पद्धत आहे या पद्धतीत वर्तमानावर भर असतो.

**नमूना निवड :**

प्रस्तुत संशोधन कार्यात माध्यमिक शिक्षणात मुलांच्या मातांचे योगदान जाणून घेणे हा मुख्य उद्‌देश होता. हा उद्‌देश विचारात घेऊन प्रातिनिधीक नमुन्याची निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास हा महाराष्ट्रातील पूर्व नागपूर शहरात करण्यात आलेला आहे. अभ्यासासाठी आवश्यक असणाऱ्या माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या मातांची निवड करताना प्रथम पूर्व नागपूरातील माध्यमिक शाळांची तसेच शाळांमधील विद्यार्थ्यांची निवड यादृच्छिक नमूना निवड पद्धतीने करण्यात आली. आणि त्यानुसार नमूना म्हणून निवडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांच्या मातांकडून माहिती मिळविण्यात आली.

**चर्चा व विश्लेषण :**

**कुटुंबप्रकार :** विषयाशी संबंधीत केलेल्या अध्ययनावरून असे निदर्शनास येते की, विभक्त कुटुंबपद्धतीचे प्रमाण जास्त आहे. ही टक्केवारी 71 टक्के इतकी आहे तर संयुक्त कुटुंबाचे प्रमाण 29 टक्के आढळले. यावरून असे म्हणता येईल की, बहुसंख्य गृहिणी विभक्त कुटुंबात राहतात. तर संयुक्त कुटुंबपद्धती हळूहळू कमी होत आहे. हयाचे प्रमुख कारण म्हणजे नोकरी वा व्यवसायानिमित्याने अनेक कुटुंब संयुक्त कुटुंबाऐवजी विभक्त कुटुंबाचा अंगीकार करतांना आढळतात.

**कुटुंबाचे उत्पन्न :** कुटुंबाच्या एकूण उत्पन्नाचा अभ्यास केला असता त्यात असे आढळले की, 25000 रू. पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण 69 टक्के तर 25000 रू. पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 31 टक्के आढळून आले. यावरून असे दिसून येते की, राज्यस्तरीय अभ्यासक्रम असणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी हे जास्तीत जास्त प्रमाणात निम्न आर्थिक स्तरातील आहेत.

**मातांचे वय** : अध्ययनावरून असे निदर्शनास येते की, 45 वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या मातांचे प्रमाण 64 टक्के इतके आढळले तर 45 वर्षापेक्षा जास्त वय असणाऱ्या माता 36 टक्के दिसून आले. यावरून असे म्हणता येते की, योग्य वयात लग्न झालेल्या गृहिणी स्वतःच्या श्रमाचे

व्यवस्थापन योग्य पद्धतीने करून आपल्या पाल्यांना मार्गदर्शन करण्यास समर्थ असतात. वयाच्या दृष्टीने शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असलेल्या या माता आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे बारकाईने लक्ष ठेवू शकतात. प्रस्तूत अध्ययनात अशाच प्रकारच्या माता आढळून आल्यात.

**मातांचे शिक्षण :** शिक्षणामुळे व्यक्तीचे व्यक्तीमत्व विकसित होते. मानवी विकासाला भरभरून उठाव देणारा हा बळकट पाया प्रस्तुत अध्ययनातील मातांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती प्रस्तुत करतो.

**मातांचे शिक्षण व शाखा :**

| अ.क्र. | मातांचे शिक्षण | कला | वाणिज्य | विज्ञान | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शालांत परीक्षा | | | | | 22 |
| 2 | उच्च शालांत परीक्षा | 9 | 5 | 3 | 6 | 23 |
| 3 | पदवी | 20 | 7 | 6 | 3 | 36 |
| 4 | पदव्युत्तर | 6 | 3 | 2 | 1 | 12 |
| 5 | त्यापेक्षा जास्त | 6 | 1 | 0 | 0 | 7 |
| | एकूण | 41 | 16 | 11 | 10 | 100 |

शालांत परीक्षा उत्तीर्ण असलेल्या मातांचे प्रमाण 22 टक्के आढळले तर उच्च शालांत परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या माता 23 टक्के आढळल्या. पदवी प्राप्त मातांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे 36 टक्के तर पदव्युत्तर मातांचे प्रमाण 12 टक्के आहे. पदव्युत्तरपेक्षाही अधिक शिक्षण घेणाऱ्या मातांचे प्रमाण देखील 7 टक्के इतके आढळले. यामध्ये अधिकाधिक गृहिणी या कला शाखेतील दिसून आल्या त्यांचे प्रमाण 41 टक्के तर वाणिज्य शाखेतील गृहिणींचे प्रमाण 16 टक्के व विज्ञान शाखेत शिक्षण घेतलेल्या 11 टक्के गृहिणी होत्या. हयाशिवाय इतर प्रकारचे शिक्षण घेणाऱ्या देखील 10 टक्के गृहिणी आढळून आल्यात. यावरून असे प्रतिपादन करता येते की बहुसंख्य गृहिणी आपली आवड व क्षमतेनुसार कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांमध्ये पदवी व त्यापेक्षा जास्त शिक्षण प्राप्त करतात. त्यांच्या या ज्ञानार्जनाचा फायदा त्यांच्या पाल्यांना निश्चितच होवू शकतो.

**4.1.6 मातांच्या कार्याचे स्वरूप :**

सर्वेक्षणावरून असे निदर्शनास येते की 65 टक्के माता या नोकरी न करणाऱ्या तर 35 टक्के माता या नोकरी करणाऱ्या आढळून आल्या. म्हणजेच आजची गृहिणी ही शिक्षीत असली तरीही कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे नोकरीला प्राधान्य देत नाही. त्यामुळे आपल्या कुटुंबियांना विशेषतः पाल्यांना त्यांना अधिक वेळ देता येतो. एका दृष्टीने मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी गृहिणींचा हा सहभाग योग्य वाटतो.

**शाळेची निवड करतांना विचारात घेतलेल्या बाबी :**


पाल्याच्या शाळेची निवड करतांना विचारात घेतलेल्या बाबींच्या संदर्भात असे दिसून आले की शाळेचा दर्जा चांगला असणे हे सर्वात महत्वाचे आहे. हे प्रमाण 80 टक्के आढळून आले. हयाशिवाय घरापासून जवळ, शाळेचा येणारा खर्च कमी असणे तसेच ओळखीचे शिक्षक व शाळेत शेजारची मुले असणे, फक्त मुलांची वा मुलींची असणे, हयाबाबीदेखील उतरत्या क्रमाने विचारात घेतल्या जातात.

**पाल्याचा अभ्यास मातांद्वारे घेण्याबाबत :**

अध्ययनावरून असे निदर्शनास येते की, 70 टक्के माता हया आपल्या पाल्याचा स्वतः अभ्यास घेतात. पाल्याचा अभ्यास स्वतः न घेणाऱ्या माता प्रमाण हे 30 टक्के आढळले. यावरुन असे म्हणता येईल की आपल्या पाल्याचे शैक्षणिक भविष्य घडविण्यासाठी बहुसंख्य माता क्रियाशील असतात.

**मातांद्वारे पाल्याचा अभ्यास घेण्याची वेळ :**

सर्वेक्षणतून असे दिसून येते की 45 टक्के माता या 1 ते 2 तास अभ्यास घेतात. 1 तासापेक्षा कमी वेळ अभ्यास घेणाऱ्या मातांचे प्रमाण 27 टक्के तर 2 ते 3 तास अभ्यास घेणाऱ्या मातांचे प्रमाण हे 20 टक्के आढळले. 3 तासापेक्षा जास्त वेळ अभ्यास घेणाऱ्या मातांचे प्रमाण हे सर्वात कमी म्हणजे 8 टक्के आढळून आले.




**पाल्याच्या अभ्यासाचे नियोजन करण्याची पद्धत :**

प्रस्तूत अध्ययनावरून असे स्पष्ट होते की, 54 टक्के माता हया अभ्यासाचे नियोजन करतांना लेखी व तोंडी हया दोन्ही पद्धतींचा उपयोग करतात. 29 टक्के माता हे वेळापत्रक तोंडी करतात तर 17 टक्के माता वेळापत्रक लेखी यादी पद्धतीने करतात.  यावरून असे म्हणता येईल की अभ्यासक्रमाशी संबंधित काही ठराविक बाबींचे नियोजन लेखी पद्धतीने केले

जात असले तरिही तोंडी नियोजन देखील करणे आवश्यक असते.

**स्वास्थ्य चांगले राहाण्यासाठी मातेकडून केले जाणारे प्रयत्न :**

28 टक्के माता हया पाल्यांना कोणताही मानसिक, शारीरिक त्रास होणार नाही याकडे लक्ष देतात तर 32 टक्के माता हया बाहेरचे पदार्थ खाण्यावर नियंत्रण ठेवतात. 26 टक्के माता पाल्यांच्या आहारात पौष्टीक पदार्थांचा समावेश करतात तर 12 टक्के माता आहारासोबतच औषधे जसे टॉनीक पिण्यास देतात. याशिवाय इतर प्रयत्न करणाऱ्या मातांचे प्रमाण 2 टक्के इतके आढळले.

**पाल्याची बुद्धीमत्ता लक्षात घेऊन अभ्यास करण्यास सांगण्याबाबत :**

पाल्याची बुद्धिमत्ता लक्षात घेऊन अभ्यास करण्यास सांगणाऱ्या मातांचे प्रमाण 81 टक्के तर बुद्धिमत्ता लक्षात न घेता अभ्यास करण्यास सांगणाऱ्या माताचे प्रमाण 19 टक्के इतके आढळले. यावरून असे म्हणता येईल की, गृहिणी आपल्या पाल्याची बुद्धिमत्ता जाणून घेऊन त्यानुसार त्यांना अभ्यास करण्यास सांगतात. जेणेकरून पाल्यांना अभ्यासाचे ओझे वाटू नये.

**निष्कर्ष :**

प्रस्तूत विषयाचे कौटुंबिक अध्ययनात विभक्त कुटुंबाचे प्रमाण जास्त आढळले. कुटुंबातील माता या नोकरी वा व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण कमी असल्यामुळे व उत्पन्नात मातांचा सहभाग फार कमी असल्यामुळे ही कुटुंबे निम्न आर्थिक स्तारातील असल्याचे निदर्शनास आले. परंतु तरिही आपल्या पाल्यांच्या माध्यमिक शिक्षणाबाबत त्या जागरूक आहेत. शाळेच्या निवडीपासून ते पाल्यांच्या अभ्यासाच्या वेळेचे नियोजन त्या योग्यरितीने करतात. शिवाय पाल्यांना अडचणी असल्यास त्या स्वतः त्यांचा अभ्यास घेण्यास समर्थ आहेत व त्याकरिता त्या आपल्या पाल्यांना आवश्यक तो वेळही देतात. त्याचप्रमाणे पाल्यांचे स्वास्थ्य उत्तम ठेवण्याकरिता देखील वेगवेगळे प्रयत्न करतांना दिसून येतात. अधिकाधिक माता पाल्यांची बुद्धीमत्ता बघून पाल्यांकडून अभ्यास करवून घेतात. ज्या मातांना आपल्या पाल्याची बुद्धिमत्ता कमी आहे असे वाटते ते पालक आपल्या पाल्याला अधिक वेळ देतात व त्यांच्या अभ्यासाकडे जास्त लक्ष देऊन त्यांच्याकडून अभ्यास करवून घेतात.

**सूचना :**

1) शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचा शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होतो हे जाणून पाल्याचे स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी प्रयत्न करावे. त्यांच्या आहाराकडे विशेष लक्ष द्यावे.

2) पालकांनी, शिक्षकांच्या वारंवार भेटी घेऊन आपल्या पाल्याविषयी अडचणी समजावून घ्याव्यात.

3) दररोज मुलांचा अभ्यास घरी घेतला जावा किंवा त्यांच्या अडचणी समजून मार्गदर्शन करावे.

4) पालकांनी आपल्या पाल्याचा बौद्धिक स्तर लक्षात घेवूनच त्यांचेकडून शिक्षणाबाबत

अपेक्षा कराव्यात.

5) मुलांना लहानपणापासूनच वाचनाची आवड निर्माण करावी. त्यासाठी त्यांना चांगली व उपयुक्त पुस्तके उपलब्ध करून द्यावीत.

**संदर्भ :**


- कुलकर्णी, के.वि 1988, शैक्षणिक मानसशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
- सलुजा, चुन्नीलाल 2007, बच्चो की प्रतिभा कैसे उभारे, पुस्तक महल, दिल्ली.
- गजरे, 2004, रा. वि. उद्योन्मुख भारतीय समाज शिक्षण व शिक्षक, नूतन प्रकाशन
- देशमुख, ज्योती 1992, स्त्री शिक्षणाचा त्यांच्या कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणाऱ्या परिणामाचा तुलनात्मक अभ्यास, शिक्षण पारंगत परीक्षेसाठी सादर केलेला प्रबंध, अमरावती विद्यापीठ.
- राऊत, अवंती 1993, विद्यार्थ्यांच्या पालकांचा आर्थिक सामाजिक स्तर व त्यांच्या पाल्यांचे शालेय संपादन यांच्या आंतरसंबंधाचा अभ्यास, शिक्षण पारंगत परीक्षेसाठी सादर केलेला प्रबंध, अमरावती विद्यापीठ.
- वारंग, भाग्यविधाता 2002, नवीन अभ्यासक्रमाच्या यशस्वीतेसाठी पालकांचे सहकार्य अपेक्षित, भारतीय शिक्षण
- तळघट्टी, विणा 1998, शिक्षण आणि व्यक्तित्व विकास, शिक्षण संक्रमण.
- जोशी, सुप्रीया 2001, वर्तमानकालीन परिस्थितीत मातेची जबाबदारी, शिक्षण संक्रमण.